# यवतमाळ जिल्हा पोलीस राजपत्र

# दिनांक - 21/08/2020

राजपत्रातील ०६ भाग –

| | |
|---|---|
| भाग – ०१ | **बदली /नेमणुक /पदोन्नती** |
| भाग – ०२ | **रजा** |
| भाग – ०३ | **वेतन/भत्ते / रोखिकरण** |
| भाग – ०४ | **बक्षिस / मानधन** |
| भाग – ०५ | **शिक्षा/ निलंबन / सेवानिवृत्ती** |
| भाग – ०६ | **प्रशिक्षण व इतर** |

मा. पोलीस अधीक्षक,
यांचे मान्यतेनुसार

( एम. एम. बागवान )
पोलीस उप अधी.(मुख्या)
पोलीस अधीक्षक यवतमाळ करीता

**प्रति,**

प्रभारी अधिकारी, सायबर सेल यवतमाळ :– सदरचे गॅझेट हे जिल्हा पोलीस दल यवतमाळ चे www.yavatmalpolice.gov.in या अधिकृत संकेत स्थळावर GAZETTE या मथळयाखाली प्रसिद्ध करावे. तसेच जिल्हयातील प्रत्येक पोस्टे./उपविपोअ./अधिकारी यांचे E - Mail वरती पाठवावे.

# भाग १ - बदली /नेमणुक /पदोन्नती

116

क्र :-पोअय/प्रलि/८०-सी/उविपोअ-उमरखेड/अति.कार्यभार/ /२०२० यवतमाळ, दिनांक :- 21 AUG 2020

**आदेश**

उपविभागीय पोलीस अधिकारी, उमरखेड उपविभाग या पदाचा अतिरिक्त कार्यभार श्री.अनुराग जैन, उपविभागीय पोलीस अधिकारी, पुसद हे पाहत आहेत. सध्या गणेशोत्सव सुरु आहे. तसेच आगामी काळात मोहरम व दुर्गा उत्सव या सारखे कायदा व सुव्यवस्थेच्या दृष्टीकोनातून महत्वाचे सण व उत्सव आहेत. त्यामुळे उपविभागीय पोलीस अधिकारी, उमरखेड उपविभाग या पदाचा अतिरिक्त कार्यभार दि.२१/०८/२०२० पासून पुढील आदेशापर्यंत श्री.मुक्तार मेहबुब बागवान, पोलीस उप अधीक्षक (मुख्यालय), यवतमाळ यांचेकडे सोपविण्यात येत आहे. सदर कालावधीत पोलीस उपअधीक्षक/श्री.मुक्तार बागवान यांचे कॅम्प ऑफिस/मुख्यालय उमरखेड राहील.

२. वरील नमूद कालावधीत पोलीस उप अधीक्षक (मुख्यालय), यवतमाळ तसेच आहरण व संविरण अधिकारी या पदाचा अतिरिक्त कार्यभार पोलीस निरीक्षक/श्री.प्रदिप शिरसकर, स्थानिक गुन्हे शाखा हे सांभाळतील.

सर्व संबंधितांनी याची नोंद घेऊन उचित कार्यवाही करावी.

**( एम.राज कुमार )**
पोलीस अधीक्षक, यवतमाळ.

प्रति,

श्री.मुक्तार मेहबुब बागवान, पोलीस उप अधीक्षक (मुख्यालय), यवतमाळ

**प्रत माहिती व उचित कार्यवाहीकरिता :-**

अपर पोलीस अधीक्षक/पोलीस उप अधीक्षक (मुख्यालय)/उविपोअ,पुसद/उविपोअ-उमरखेड/वाचक शाखा-पो.अ./डिपीजी लिपिक/स्वीय सहायक / पोनि / स्था. गु.शा.

# भाग २ - रजा

6882 21 AUG 2020

क्रमांकः आशा-५/५१-डी/ परावर्तीत रजा/विविध/२०२०/ यवतमाळ दिनांक-

**आदेश**

खालील नमुद पोलीस कर्मचारी यांचा म.ना.से.रजा.नियम १९८१ चे नियम क्रमांक(६१)व (५१)अन्वये नमुद वैदयकीय कालावधी हा परावर्तीत व अर्जीत रजेत रूपांतरीत करण्यात येत आहे.

| अ क्र | कर्मचा-याचे नांव | नेमणुक पो.स्टे | उपभोगलेला कालावधी दिवस | मंजुर रजा |
|---|---|---|---|---|
| १ | पोशी/२१०४,प्रदिप माटे | खंडाळा | दि.१७/०१/२०१९/ते १९/११/२०१९ / २५दिवस | परावर्तीत रजा |
| २ | चापोशी/२४८०,सुरज पातुरकर | मो.प.वि.यवतमा | दि.२२/०७/२०/ते ६/८/२०/ १५ दिवस | बिनपगारी रजा |
| ३ | मपोकॉ/२४०५,निलम कोडापे | पाटन | दि.०९/०४/२०/ते २९/०४/२०/ १९ दिवस | बिपगारी रजा |

**(मा.पो.अ.यांचे आदेशान्वये)**

(सुशिला पवार)
प्र.कार्यालय अधिक्षक
पोलिस अधीक्षक यवतमाळ करिता

**प्रति,**

**वरील सबंधीत ठाणेदार.**

**प्रत -वेतन लिपीक-1यांना व्दिप्रतीत/डीपीजी लीपीक यांना आवश्यक कार्यवाही.**

6868

क्रमांक पोअय/सआली-४/सिक हजर/पोशि-९८०अजय/ /२०२० यवतमाळ दिनांक 21 AUG 2020

आदेश :-

पोशि/९८० अजय निंभोरकर नेमणुक पोमु (संलग्न सायबर सेल) हे दिनांक २२.०७.२०२० ते १९.०८.२०२० पर्यंत सिक रजेवर होते.तरि त्यांना कर्तव्यावर हजर करून घ्यावे,तसेच त्यांचा वर नमुद सिक कालावधी परावर्तीत रजा म्हणुन मंजुर करण्यात येत आहे.

( मा.पो. उपअधिक्षक यांचे मान्यतेने )

(सुशिला पवार)
प्र.कार्यालय अधिक्षक
पोलीस अधिक्षक यवतमाळ करीता

प्रति

प्रभारी अधिकारी सायबर सेल

प्रत रापानि पोमु यवतमाळ/वेतन लिपीक-१/डीपीजी लिपीक

क्रमांक:पोअय/डिपी/३१-बी-२/ 6896 /२०२० यवतमाळ दिनांक : 21 AUG 2020

संदर्भ :- मा. वि.पो.म.नि यांचे आदेश क्र. अप कक्ष-५/यवत/पोहवा-श्रावण दाढे/अपील आदेश/१९६/२०२०/२७९१ अमरावती दि. २१/०७/२०२०

विषय :- अपिल आदेश दुय्यम प्रत सादर करणेबाबत.
पोहवा/१७१५ श्रावण दाढे, नेमणुक पो.स्टे. दारव्हा

***

उपरोक्त संदर्भांकित विषयान्वये, प्राप्त अपिल आदेशाची मुळ प्रत पोहवा/१७५७ श्रावण दाढे यांना अदा करुन, दुय्यम प्रतीवर त्यांची दिनांकीत स्वाक्षरी घेऊन, ती दुय्यम प्रत या कार्यालयास सादर करावी.

सहपत्र : अंतिम आदेश मुळ व दुय्यम प्रत.

(पि.जी. शिरस्कर)
प्र. पोलीस उप अधिक्षक (मुख्या.)
पोलीस अधिक्षक कार्या. यवतमाळ

प्रति,
पोहवा/१७१५ श्रावण दाढे, नेमणुक पो.स्टे. दारव्हा
मार्फत : ठाणेदार पो.स्टे.दारव्हा

प्रत :- कर्मचारी आस्थापना लिपीक/सआली-४/वेतन लिपीक-१/डिपीजी लिपीक यांना माहिती व योग्य कार्यवाहीस्तव

क्रमांक: अप/कक्ष-५/यवत./पोहवा-श्रावन दाढे/अपील आदेश/१९६/२०२०/2791 अमरावती दि. 31 JUL 2020

**वाचा :-** १) पोहवा/श्रावन तुळशिराम दाढे नेमणुक, पो.स्टे. यवतमाळ शहर जि. यवतमाळ यांचेविरुध्द करण्यात आलेल्या संक्षिप्त चौकशीच्या कार्यवाहीचे कागदपत्रे.


DR ...25 AUG 2020
Branch D.E.
S.P.
Addl. S.P.
Dy.S.P.H.Q.
O.S.
H.C.
I.N. No. 1506 5/8/2020


२) पोहवा/श्रावन दाढे यांना "एक महिन्याचे मुळ वेतनाइतका आर्थिक दंड" याबाबत पोलीस अधीक्षक, यवतमाळ यांचे आदेश क्र. डीपी/३१-बी-२/पोउपनि शुभांगी मोरे+२/अ.आ/११०६७/२०१९ दि. २४.०९.२०१९ अन्वये दिली आहे.

३) वरील नमुद शिक्षा आदेशाविरुध्द पोहवा/श्रावन दाढे यांनी या कार्यालयाकडे सादर केलेला अपील अर्ज

--- ००० ---

## अपील आदेश

पोहवा/१७१५ श्रावन तुळशिराम दाढे नेमणुक, पो.स्टे. यवतमाळ शहर जि. यवतमाळ येथे नेमणुकीस असतांना त्यांनी केलेल्या खालील नमुद कसुरी बद्दल पोलीस अधीक्षक, यवतमाळ यांनी संक्षिप्त चौकशी करुन, **"एक महिन्याचे मुळ वेतनाइतका आर्थिक दंड"** ही शिक्षा दिलेली आहे.

**कसुरी :-**

252

पो.स्टे. अंतर्गत दाखल होणा-या अपघाती मृत्युच्या गुन्हयात तक्रार दाखल होताच तपासी अधिकारी यांचेकडुन D.A.R. फॉर्म विहीत नमुन्यात भरुन विहीत मुदतीत संबंधित प्राधिकरण, विमा विभाग, वाहन धारकाकडे सादर करण्याबाबत पो.स्टे. प्रभारी अधिकारी यांना आदेशित केले परंतु त्यांनी सदर फॉर्म सादर केले नसल्याने अशा प्रकारे कर्तव्यात निष्काळजीपणा व हलगर्जीपणा केल्याचे दिसुन आले आहे.

उपरोक्त कसुरी बाबत अपीलार्थीस " **एक महिन्याचे मुळ वेतवाइतका आर्थिक द्वंड** " ही शिक्षा का करण्यात येवु नये म्हणुन हया प्रस्तावित शिक्षेची कारणे दाखवा नोटीस देण्यात आली असता सदर नोटीस त्यांनी स्विकारुन त्यावर स्पष्टीकरण सादर न केल्याने पोलीस अधीक्षक, यवतमाळ यांनी अपीलार्थीस शिक्षा मान्य आहे असे गृहीत धरुन कारणे दाखवा नोटीसमध्ये प्रस्तावित केलेल्या शिक्षेचे अंतिम आदेश पारित करण्यात आले.

अपीलार्थी पोहवा/श्रावन तुळशिराम दाढे नेमणुक, पो.स्टे. यवतमाळ शहर जि. यवतमाळ यांनी सदर शिक्षेच्या आदेशाविरुध्द या कार्यालयास उद्देशुन सादर केलेला अपील अर्ज मुदतीत असल्याने तो विचारार्थ घेण्यात आलेला आहे.

एंकदरीत पोहवा/१७१५ श्रावन तुळशिराम दाढे नेमणुक, पो.स्टे. यवतमाळ शहर जि. यवतमाळ यांच्याविरुध्द करण्यात आलेल्या संक्षिप्त चौकशीच्या कागदपत्रांची व अपील अर्जात त्यांनी उपस्थीत केलेल्या मुद्यांची व त्यावर पोलीस अधीक्षक यांनी सादर केलेल्या निराकरण टिपणीचे काळजीपुर्वक अवलोकन केले. अपीलार्थी यांनी त्यांचे अपील अर्जात उपस्थित केलेले मुद्दे आम्हास अंशत: समाधानकारक व संयुक्तिक दिसुन येत असल्याने मी, **मकरंद रानडे,** विशेष पोलीस महानिरीक्षक, अमरावती परिक्षेत्र, अमरावती खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

-: आदेश :-

पोहवा/१७१५ श्रावन तुळशिराम दाढे नेमणुक, पो.स्टे. यवतमाळ शहर जि. यवतमाळ त्यांचे आदेश क्र. डीपी/३१-बी-२/पोउपनि शुभांगी मोरे+२/अं.आ/११०६७/२०१९ दि. २४.०९.२०१९ अन्वये दिलेल्या **"एक महिन्याचे मुळ वेतनाइतका आर्थिक दंड"** या शिक्षेत अंशतः बदल करुन **"३००/- रु. आर्थिक दंड "** ही शिक्षा देण्यात येत आहे.

त्यांची इच्छा असल्यास ते हा आदेश प्राप्त झाल्याचे दिनांकापासुन ६० दिवसाचे आत मा. पोलीस महासंचालक म.रा. मुंबई यांचेकडे योग्य मार्फतीने फेर अपील अर्ज सादर करु शकतात.

31.7

( मकरंद रानडे )
विशेष पोलीस महानिरीक्षक,
अमरावती परिक्षेत्र, अमरावती

प्रति,

पोहवा/१७१५ श्रावन तुळशिराम दाढे नेमणुक, पो.स्टे. यवतमाळ शहर जि. यवतमाळ.

प्रत व मार्फतः- पोलीस अधीक्षक, यवतमाळ.

२/- कृपया वर नमुद आदेशाची मुळ प्रत पोहवा/श्रावन तुळशिराम दाढे नेमणुक, पो.स्टे. यवतमाळ शहर जि. यवतमाळ यांना अदा करुन दुय्यम प्रतीवर त्यांची दिनांकीत स्वाक्षरी घेवुन ती प्रत या कार्यालयास सादर करावी.

३/- अपीलार्थी यांचे विरुध्दचे कार्यवाहीचे मुळ कागदपत्रे यासोबत जोडुन परत पाठविण्यात येत आहे ते मिळाल्याची पोच दयावी.